विषय- सर्वोच्च न्यायालय याचिका क्रमांक २०२/९५ व १७१/९६ मध्ये दिनांक १२.१२.९६ रोजी झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने "वन" या संज्ञेत येणा-या क्षेत्राबाबत.

क्रमांक कक्ष-३/जमीन/ ८५७ /२००४-२००५,
पुणे ४११ ००४, दिनांक १३ डिसेंबर, २००४.

प्रति,

**मुख्य वनसंरक्षक व केन्द्रस्थ अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य, नागपूर.**

**संदर्भ-** आपलेकडील दिनांक १३.१२.२००४ रोजीचा दूरध्वनी संदेश.

आपलेकडील दिनांक १३.१२.२००४ रोजीचे दूरध्वनी संदेशाचे अनुषंगाने अहवाल सादर करण्यात येतो की, याचिका क्रमांक २०२/९५ व १७१/९६ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२.१२.९६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार प्रत्येक जिल्ह्यातून "वन" या संज्ञेत अभिज्ञात केलेल्या क्षेत्राची माहिती विहित मुदतीत मागविण्यात आली होती.

प्रत्येक जिल्ह्यातून "वन" या संज्ञेत बसणा-या क्षेत्राची माहिती जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने सादर केली. या संदर्भात जिल्हाधिकारी, पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक अमफ/४७६७/९७, पुणे, दिनांक ३०.७.१९९७ अन्वये, विषयांकित प्रकरणाची माहिती, प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना खालील प्रमाणे कळविलेली आहे.

| अ.क्र. | तहसिलचे नांव | वन म्हणून अधिसुचित न झालेले परंतु वनीकरण झालेले क्षेत्र | | एकुण क्षेत्र (हेक्टर - आर) |
|---|---|---|---|---|
| | | शासकीय (हेक्टर आर) | खाजगी (हेक्टर - आर) | |
| १ | हवेली | २४४.६२ | -- | २४४.६२ |
| २ | जुन्नर | ६९.२४ | -- | ६९.२४ |
| ३ | पुणे शहर | ९७.९५ | -- | ९७.९५ |
| ४ | आंबेगाव | ३९६.०० | -- | ३९६.०० |
| ५ | खेड | ३६९.०० | -- | ३६९.०० |
| एकूण | | ११७६.८१ | -- | ११७६.८१ |

वर नमुद केलेल्या माहिती पैकी अनुक्रमांक १ व ३ मध्ये नमुद केलेल्या हवेली तालुक्यातील २४४.६२ हेक्टर व पुणे शहरातील ९७.९५ हेक्टर अशा एकुण ३४२.५७ हेक्टर क्षेत्राचा पुणे वन विभागाचे अधिनस्त क्षेत्रात समावेश होतो.

उपरोक्त तक्त्यामधील जिल्हास्तरीय संकलीत माहिती सर्व्हे नंबर निहाय, गांव निहाय आवश्यक असल्याने, पुणे वन विभागाच्या अधिनस्त क्षेत्राची माहिती खालील प्रमाणे सादर केली आहे.

| वन विभाग | | गांवचे नांव | आयडेन्टीफाईड क्षेत्राचा सर्व्हे क्रमांक | आयडेन्टीफाईड क्षेत्र. (हेक्टर-आर) | शेरा (मॅग्रुव्ह/ शासकीय /खाजगी) |
|---|---|---|---|---|---|
| पुणे (हवेली तालुका) | १ | पाषाण | १३३, १०९/१, १४३. | ५४.०० | महसूल क्षेत्र |
| | | पाषाण | ३८, ३९ | ४३.०० | महसूल क्षेत्र |
| | २ | दिघी | २१, २२, २३पै, २६पै, २८पै, २९पै, ३५, ३६, ३७, ३८, ३९पै, ४०पै, ४१पै, ४२, ४३, ४६पै, ४७पै, ४८पै. | १००.०० | संरक्षण विभागाकडील क्षेत्र |
| | ३ | वानवडी | ४८अ/,४४पै, ४७पै, ५०पै, ५१पै, ५६पै | १५.९५ | राज्य राखीव पोलिस दलाचे क्षेत्र |
| पुणे (पुणे शहर) | १ | पुणे (डेक्कन कॉलेज) | -- | ३०.०० | डेक्कन कॉलेज, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे. |
| | २ | पुणे (डेक्कन कॉलेज) | -- | ४.०० | डेक्कन कॉलेज, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे. |
| | ३ | पुणे (गुलटेकडी) | -- | ४०.०० | संरक्षण विभागाकडील क्षेत्र |
| | ४ | पाचगाव पर्वती | -- | २२ | शाहू कॉलेज शिंदे प्रशाला |
| एकूण | | | | ३०८.९५ | |

पुणे वन विभागांतर्गत "वन" या संज्ञेत बसणा-या एकूण ३४२.५७ हेक्टर क्षेत्रापैकी ३०८.९५ हेक्टर क्षेत्राची सर्व्हेनिहाय माहिती वरील प्रमाणे सादर केली आहे. या विभागातील "वन" या संज्ञेत मोडणारे क्षेत्र हे फक्त पुणे शहर व हवेली तालुक्यातीलच आहे; सदर क्षेत्र पुणे वन विभागातील इतर तालुक्यापैकी जसे मावळ, मुळशी, दौंड, बारामती, इंदापूर इत्यादी तालुक्यातील क्षेत्राचा यामध्ये समावेश नाही. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीने सादर केलेल्या "वन" या संज्ञेत बसणा-या एकूण ३४२.५७ हेक्टर क्षेत्रापैकी उर्वरीत ३३.६२ हेक्टर क्षेत्राची गांव निहाय व सर्व्हे नंबर निहाय माहिती जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून प्राप्त करुन घेणेबाबत पाठपुरावा चालू आहे.

उप वनसंरक्षक,
**पुणे वन विभाग, पुणे.**

स्थळप्रत

प्रतिलिपी,

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे यांचेकडे या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-३/जमीन/३४०, दिनांक ३०.६.२००४ चे अनुषंगाने माहितीसाठी सविनय सादर.

उप वनसंरक्षक,
**पुणे वन विभाग, पुणे.**